# प्रशिक्षण आवश्यक आहे !



महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ नुसार महाराष्ट्रात १८ हजाराच्यावर नागरी व ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था नोंदणीकृत आहेत. उपविधी प्रमाणे किमान १३ संचालक प्रत्येक पतसंस्थेमध्ये असणे आवश्यक केले आहे. शिवाय त्यामध्ये तज्ञ संचालकांचा सुध्दा समावेश अनिवार्य केलेला आहे. हेतू एवढाच आहे की, पतसंस्थेमध्ये कोणीतरी सहकार क्षेत्रातील शिक्षीत, अनुभवी व तज्ञ असावा जेणेकरून पतसंस्थेचा दैनंदिन कारभार हा नियम व कायद्यानुसार व्हावा तसेच सभासद व ठेवीदारांचा पैसा सुरक्षीत रहावा. सभासदांच्या सर्व रकमांचे नियोजन कायद्यान्वये व्हावे, ही महत्वाची बाब ह्यामध्ये अंतर्भुत आहे. हे पतसंस्थेच्या प्रत्येक पदाधिकारी, संचालक व सेवकांना ज्ञात होणे आवश्यक आहे. संचालक व सेवक यांना पतसंस्थेचा मान्य उपविधि व सहकार कायद्याचे किमान ज्ञान  असणे आवश्यक आहे. यासाठी केवळ पुस्तक वाचून  हे ज्ञान प्राप्त होऊ शकत नाही. त्यासाठी प्रत्येकाने प्रशिक्षीत होणे आवश्यक आहे. म्हणूनच महाराष्ट्र **राज्याच्या मा. सहकार आयुक्तांनी दिनांक २९/०४/२०१० व ३०/०४/२०११ रोजी आपल्या परिपत्रकाद्वारे लेखापरिक्षणांच्या गुणांकामध्ये सलग ३ दिवस प्रत्येक वर्षी पतसंस्थेमधील १०० टक्के संचालक व सेवक वर्ग प्रशिक्षीत होणे अनिवार्य केले आहे.** त्यासाठी लेखापरिक्षणाच्या गुण निकषांमध्ये सर्व संचालकांनी सलग ३ दिवस प्रशिक्षण घेतल्यास १० मार्क्स व सर्व कर्मचाऱ्यांनी सलग ३ दिवस प्रशिक्षण घेतल्यास २० मार्क्स निश्चित केलेले आहेत. याचाच अर्थ असा की, केवळ लेखापरिक्षणातील गुणांसाठी प्रशिक्षण घेणे एवढा याचा मर्यादित हेतू नसून, प्रत्येकास म्हणजे संचालक व सेवकांस आपली पतसंस्था

आर्थिकदृष्ट्या सक्षम कशी ठेवता येईल व दैनंदिन कारभार नियम व कायद्याप्रमाणेच कसा होईल हे पाहणे आवश्यक आहे. यासाठी प्रशिक्षण कशाचे, कुठल्या विषयाचे होणे आवश्यक आहे, हे प्रत्येक संचालक व सेवकाने माहिती करून घेणे गरजेचे आहे. पतसंस्थांचे ६०० गुणांचे लेखापरिक्षण निकष आता सर्वाना समजण्यास सुरुवात झालेली आहे. ज्यामध्ये प्रामुख्याने **भांडवल पर्याप्तता, जिंदगीची गुणवत्ता, कार्यपध्दती व नियंत्रण, स्वनिधी, तरलता व उत्पन्न/ नफा या सहा बाबींचा मुख्य समावेश यात होतो**. ह्या प्रशिक्षण कालावधीमध्ये थकबाकी वसुली, व्यवस्थापन व नफा तोटा इत्यादी बाबतसुध्दा प्रशिक्षण दिले जाते. शिवाय कर्जवाटप व वसुलीबाबतसुध्दा योग्य रितीने मार्गदर्शन केले जाते.

**भांडवल पर्याप्तता** मध्ये १. स्वनिधी, २. स्वनिधी वाढविण्याची क्षमता, ३. स्वनिधीमधील वाढ, ४. उत्तम जिंदगीवरील तरतुदीसाठी १०० गुण आरक्षित केले आहेत. **जिंदगीची गुणवत्तामध्ये** १. नेट एन. पी. ए, २. ग्रॉस एन. पी. ए., ३. कर्जव्यहारासाठी १०० गुण आरक्षित केले आहेत. **व्यवस्थापनासाठी** १०० गुण आरक्षित केले आहेत. **उत्पन्न व नफ्यामध्ये** १. निव्वळ नफ्याचे सरासरी खेळत्या भांडवलाशी प्रमाण, २. निव्वळ नफ्याचे कर्ज अधिक गुंतवणुकीचे प्रमाण, ३. निव्वळ नफ्याचे स्वनिधीशी प्रमाण, ४. व्याजातील सरासरी मार्जीन, ५. शिल्लक नफा व सर्व निधीस वर्ग केलेल्या नफ्याचे निव्वळ नफ्याशी प्रमाण, ६. व्यवसायातील नफ्याचे सरासरी खेळत्या भांडवलाशी प्रमाण, ७. व्यवस्थापन खर्चाचे सरासरी खेळत्या भांडवलाशी प्रमाणासाठी १०० गुण आरक्षित केले आहेत. **लिक्वीडीटीमध्ये** १. सी. डी. रेषो, २. दैनंदिन तरलता व रोखता सतत ठेवणे, ३. मुदत ठेवींचे एकूण ठेवींशी प्रमाण, ४. एकूण गुंतवणुकीत अनुत्पादक गुंतवणुकीचे प्रमाण इत्यादीसाठी १०० गुण आरक्षित केले आहेत. तसेच पतसंस्थेची **कार्यपध्दती व नियंत्रणासाठी** १०० गुण आरक्षित केले आहेत. आणि लेखापरिक्षणाद्वारे अ, ब, क, ड वर्ग मिळविण्यासाठी आवश्यक **गुणपत्रिका तयार केल्यानंतर लेखापरिक्षण वर्गवारी सरासरी वेटेज ॲव्हरेजवर खालीलप्रमाणे दिली आहे.**

| अनु. | मिळालेले गुण (%) | लेखापरिक्षण वर्ग |
|---|---|---|
| १. | ७५ % व त्यांचेवर गुण मिळाल्यास | अ |
| २. | ६१ % ते ७४ % पर्यंत गुण मिळाल्यास | ब |
| ३. | ५१ % ते ६०% पर्यंत गुण मिळाल्यास | क |
| ४. | ५० % पर्यंत गुण मिळाल्यास | ड |

याप्रमाणे पतसंस्थांचे संचालक व सेवकांनी प्रक्षिशण घेत असतानाच वसुली व विक्री अधिकारी यांचेसाठी सुध्दा प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. जर एस. आर. ओ. ला आपले अधिकार व कर्तव्याची माहितीच नसेल तर तो एस. आर. ओ. नियमाप्रमाणे थकबाकी वसुली करू शकत नाही. किंबहुना थकबवाकी वसुलीला मर्यादा येतात. आणि त्याचा परिणाम पतसंस्थेच्या आर्थिक कारभारावर थेट होतो. सभासद व ठेवीदारांनी भाग व ठेव रूपाने ठेवलेल्या रकमा त्यांचे विनियोजन ज्यांना कायद्याप्रमाणे व यशस्वीरित्या करावयाचे आहे व ज्यांना आपल्या पतसंस्था खऱ्या अर्थाने सक्षम करावयाच्या आहेत त्या सर्व संचालक व सेवकांनी प्रत्येक वर्षी सलग ३ दिवस प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. आणि हे प्रशिक्षणाचे काम **''बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन, मुंबई'' वर्षानुवर्षे अखंडीतपणे प्रत्येक महिन्याला काम करते. त्यासाठी प्रशिक्षण घेणारे पतसंस्थांचे पदाधिकारी, संचालक व सेवक वर्ग मोठ्या संख्येने प्रत्यक्ष प्रशिक्षणात भाग घेतात.** सलग ३ दिवस हा प्रशिक्षणाचा कार्यक्रम फेडरेशन राबविते. आणि याची प्रत्येक महिन्याची प्रशिक्षणाची जागा, दिनांक व वेळ तसेच आकारवायचे शुल्क याबाबत **बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन, मुंबई चे मुखपत्र ''पतसंस्था परिवार'' मध्ये शेवटच्या मागील पानावर प्रसिध्द केले जाते.** तरी पतसंस्थांचे संबंधीत पदाधिकारी, संचालक व सेवकांनी या प्रशिक्षणासाठी अग्रक्रम देवून फेडरेशनच्या कामकाजात नियमीतपणे सहभागी व्हावे व **मुख्यत्वे प्रशिक्षणावर भर द्यावा,** हे आवाहन या निमित्ताने या अग्रलेखात करीत आहोत.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!